# अॅग्रोमेट अॅडवायझरी बुलेटीन

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, कोल्हापूर

## विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर

**दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६** **ईमेल: adrkolhapur@rediffmail.com**

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. ३०.०१.२०२६

**जिल्हा : कोल्हापूर**

| मागील आठवड्यातील हवामान (२४.०१.२०२६ ते ३०.०१.२०२६) | | | | | | | हवामान घटक | | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (३१.०१.२०२६ ते ०४.०२.२०२६) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २४ | २५ | २६ | २७ | २८ | २९ | ३० | दिनांक | | ३१ | ०१ | ०२ | ०३ | ०४ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | पाऊस (मिमी) | | ० | ० | ० | ० | ० |
| २९.० | २९.४ | ३१.० | ३१.५ | ३१.२ | ३१.० | ३१.४ | कमाल तापमान (अं.से.) | | ३० | ३१ | ३१ | ३१ | ३२ |
| १३.८ | १४.६ | १७.८ | १९.२ | १७.६ | १७.२ | १६.८ | किमान तापमान (अं.से.) | | २० | १९ | १९ | १९ | २१ |
| ० | ० | ० | ० | ० | ० | ० | स. | ढग स्थिती (आकाश) | ३ | १ | १ | ० | ३ |
| ० | ० | ० | ८ | ० | ४ | ४ | दु. | | | | | | |
| ८२ | ८१ | ७९ | ८९ | ८३ | ७३ | ७६ | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | | ६९ | ६६ | ६२ | ५९ | ५५ |
| ४४ | ४५ | ४६ | ५५ | ४७ | ४९ | ४४ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | | ४१ | ३८ | ३७ | ३७ | ३६ |
| २.७ | २.७ | २.६ | ३.६ | ३.७ | २.५ | २.८ | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | | ५ | ६ | ६ | ६ | ६ |
| प.वा. | प.वा. | पू.आ. | वा. | ई. | पू.आ. | पू.आ. | स. | वाऱ्याची दिशा | पू.आ. | पू.आ. | पू.आ. | पू.आ. | आ. |
| वा. | नै. | आ. | ई. | पू. | आ. | आ. | दु. | | | | | | |
| मागील आठवड्यातील पाऊस (मिमी) | | | | पाऊस ०१.०१.२०२६ पासून आजपर्यंत (मिमी) | | | | | पाऊस दिवस ०१.०१.२०२६ पासून आजपर्यंत | | | | |
| ३.२ | | | | ३.२ | | | | | १ | | | | |

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश | | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार कोल्हापूर जिल्ह्यामध्ये दिनांक ३१ जानेवारी आणि ४ फेब्रुवारी रोजी आकाश अंशत: ढगाळ राहण्याची तसेच १, २ आणि ३ फेब्रुवारी रोजी आकाश मुख्यत: स्वच्छ राहण्याची शक्यता आहे. कोल्हापूर जिल्ह्यामध्ये ४ फेब्रुवारी पर्यंत कमाल तामान ३०.० ते ३२.० अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची तसेच किमान तापमान १९.० ते २०.० अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची शक्यता आहे. सकाळची सापेक्ष आद्रता ५५ ते ६९% या दरम्यान तर दुपारची सापेक्ष आद्रता ३६ ते ४१ % या दरम्यान राहण्याची शक्यता आहे. वाऱ्याचा वेग ताशी ५ ते ६ किमी या दरम्यान राहण्याची शक्यता आहे. |
| विस्तारित श्रेणी अंदाज | | विस्तारित श्रेणीच्या अंदाजानुसार मध्य महाराष्ट्रामध्ये दिनांक ४ ते १० फेब्रुवारी २०२६ दरम्यान पावसाचे प्रमाण सरासरी पेक्षा कमी राहण्याची, कमाल तापमान सरासरी पेक्षा कमी राहण्याची तसेच किमान तापमान सरासरी दरम्यान राहण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | ➢ फळे तसेच भाजीपाला पिकांमध्ये जमिनीतून बाष्पिभवन कमी होऊन जमिनीमध्ये ओलावा टिकवून ठेवण्यासाठी आच्छादनाचा वापर करावा.<br>➢ वेलवर्गीय भाजीपाला पिकांना आधार देण्यासाठी मंडप (दुधी भोपळा) व इतर पिकांसाठी ताटी पध्दतीचा वापर करावा. |
| संदेश | | ❖ उस: फेब्रुवारीमध्ये बाष्पीभवनचा वेग ५.५ मिलीमीटर प्रती दिवस येवढा येत आहे त्यामुळे ऊस पिकास दररोज ३.२७ लिटर पाण्याची आवश्यकता असते ती पूर्ण करण्यासाठी ठिबक सिंचन संच (४ लिटरचा ड्रीपर) दररोज ४९ मिनिटे चालवावा. |
| गहू | फुलोरा ते चिक भरणे | ➢ मागील आठवड्यामध्ये हवेतील आद्रता वाढलेली असल्यामुळे गहू पिकावर तांबेरा रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. तांबेरा रोगाची लागण दिसून येताच मॅन्कोझेब ७५% डब्लू.पी. ३० ग्रॅम १० लिटर पाण्यातून किंवा टेब्युकोनॅझोल ५०% + टायफ्लोक्झीस्ट्रोबीन २५% डब्ल्यु.जी. १० ग्रॅम / १० लिटर पाणी या संयुक्त बुरशीनाशकांची फवारणी करावी. |
| मका | शाखिय वाढ | ➢ मागील आठवड्यामध्ये अंशत: ढगाळ हवामान असल्याने व सकाळच्या हवेतील आद्रतेचे प्रमाण वाढल्यामुळे अमेरिकन लष्करी अळीचा प्रादुर्भाव काही भागात दिसून येत आहे. प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी खालील उपाययोजना कराव्यात.<br>➢ **भौतिक उपाय:** प्रादुर्भाव ग्रस्त पिकावरील अंडीपुंज गोळा करून नष्ट करावेत<br>➢ **रासायनिक उपाय:**<br>➢ अळीच्या वाढीच्या लवकरच्या (१ ते ३ अवस्था) अवस्थांमध्ये निमअर्क १५०० पीपीएम ५ मिली किंवा निंबोळी अर्क ५% यांची प्रती लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. **किंवा**<br>➢ क्लोरॅट्रॅनिलीप्रोल १८.५% एस.सी. ४० जी.ए.आय./ हेक्टर किंवा इमामेक्टीन बेंझोएट ५% एस.जी ८ ग्रॅम प्रती लिटर या प्रमाणात फवारणी करावी. **किंवा**<br>➢ स्पिनेटोरम ११.७ एस.सी. या किटकनाशकाची ०.५ मिली प्रती लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. |
| हरभरा | फुलोरा ते घाटे भरणे | ➢ हरभऱ्यावरील घाटेअळीच्या नियंत्रणासाठी पक्षी थांबे उभारावेत व हेक्टरी ५ या प्रमाणे कामगंध सापळे लावावेत.<br>➢ हरभऱ्यावरील घाटेअळीच्या नियंत्रणासाठी हेलिओकिल ५०० मिली ५०० लिटर पाणी या प्रमाणात मिसळून प्रती हेक्टर फवारणी करावी. |
| भुईमुग | पेरणी | ➢ संरक्षित पाण्याची उपलब्धता असल्यासच उन्हाळी भुईमुग पेरणी १५ फेब्रुवारी पर्यंत करावी<br>➢ पेरणीपुर्वी २.५ ग्रॅम मॅन्कोझेब किंवा ४ ग्रॅम ट्रायकोडर्मा जैविक बुरशीनाशक प्रती किलो बियाणास वापरून बीजप्रक्रिया करावी.<br>➢ बुरशीनाशकाचे प्रक्रियेनंतर १ किलो बियाणांस २५ ग्रॅम रायझोबियम व २५ ग्रॅम स्फुरद विरघळणाऱ्या जीवाणू खतांची बीजप्रक्रिया |

**दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६** **ईमेल: adrkolhapur@rediffmail.com**

| | | |
|---|---|---|
| | | करावी.<br>➢ पेरणीच्या वेळी भुईमूग पिकास हेक्टरी २५ किलो नत्र व ५० किलो स्फुरद द्यावे. स्फुरद खताची मात्रा शक्यतो सिंगल सुपर फॉस्फेटच्या माध्यमातून दयावी. यासोबत पिकास हेक्टरी १२५ किलो जिप्समचा पहिला हप्ता द्यावा.<br>➢ जस्त व बोरॉन या सुक्ष्म अन्नद्रव्यांची कमतरता असलेल्या जमिनीत दोन वर्षातुन एकदा हेक्टरी २५ किलो झिंक सल्फेट व ५ किलो बोरॅक्स, सेंद्रिय खतांसोबत जमिनीतुन पेरणीपुर्वी द्यावे. |
| ऊस | सुरु ऊस लागवड | ➢ सुरु ऊस लागणीसाठी पूर्व मशागतीची कामे पूर्ण करून दोन डोळा टिपरीने ऊसाची लागण १५ फेब्रुवारी पर्यंत करावी.<br>➢ उसाची लागण सलग पध्दतीने करताना दोन सऱ्यामधील अंतर मध्यम जमिनीत १ मीटर व भारी जमिनीत १.२० मीटर ठेवावे.<br>➢ तसेच जोड ओळ पध्दतीने लागण करावयाची असल्यास मध्यम जमिनीत २.५-५ फूट व भारी जमिनीत ३-६ फूट अंतर ठेवावे.<br>➢ लागणीपूर्वी बेणे १० ग्रॅम कार्बेन्डॅझिम १० लिटर पाण्यात मिसळून त्यामध्ये १०-१५ मिनिटे बुडवावे व<br>➢ नंतर अॅसेटोबॅक्टर व स्फुरद विरघळविणारे जिवाणू अनुक्रमे १ किलो व १२५ ग्रॅम प्रति १०० लिटर पाण्यात मिसळून त्यात कांडया ३० मिनीटे बुडवून लगेच लागण करावी. |
| वांगी | लागवड | ➢ उन्हाळी हंगामातील वांगी लागवड फेब्रुवारी मध्ये सुरू करावी<br>➢ सुधारित वाण: मांजरी गोटा, फुले हरित, कृष्णा (संकरीत), फुले अर्जुन (संकरीत)<br>➢ लागवडीचे अंतर: उन्हाळी : ७५x७५ सेंमी, संकरीत : १२० x ९० सेंमी<br>➢ खते: लागवडीच्या वेळी प्रती हेक्टरी ७५ किलो नत्र (३ गोणी २८ किलो युरिया), ७५ किलो स्फुरद ( ९ गोणी १८ किलो सिंगल सुपर फॉस्फेट) आणि ७५ किलो पालाश ( २ गोणी २९ किलो म्युरेट ऑफ पोटॅश) द्यावे. |
| आंबा | मोहोर | ➢ पश्चिम महाराष्ट्रात केशर आंब्यामध्ये उभयलिंगी फुलांचे प्रमाण, फलधारणा आणि उत्पादन वाढविण्यासाठी १% पोटॅशियम डायहायड्रोजन फॉस्फेटची (१०० ग्रॅम/१० लिटर पाण्यात) मोहोर फुटण्याच्या वेळी आणि त्यानंतर एक महिन्यानी १% पोटॅशियम नायट्रेटची (१०० ग्रॅम / १० लिटर पाण्यात) फवारणी करावी. (भा.कृ.अनु.प.) |
| पशुधन | वाढीची | ➢ उन्हाळी हंगामासाठी ज्वारी, मका, चवळी, आणि संकरीत नेपियर गवत या चारा पिकांची लागवड करावी<br>➢ उन्हाच्या तीव्रतेपासून बचावासाठी जनावरे सावलीमध्ये बांधावीत. जनावरांना शुद्ध, स्वच्छ आणि थंड पाणी पिण्यास द्यावे. |

| मेघदूत | दामिनी |
|---|---|
| अॅप्लिकेशन डाउनलोड करण्यासाठी स्कॅन करावे | अॅप्लिकेशन डाउनलोड करण्यासाठी स्कॅन करावे |

स्त्रोत

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

२) मागील हवामान : भारत मौसम विज्ञान विभाग वेधशाळा विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर

ठिकाण : कोल्हापूर

दि. : ३०.०१.२०२६

**स्वाक्षरीत**

**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, कोल्हापूर तथा**

**सहयोगी संशोधन संचालक,**

**विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर**